Histori City


ISSN : 2393-8900

# Historicity

## International Research Journal

UGC APPROVED

Volume - 5 | Issue - 8 | April - 2019
Impact Factor : 2.7825(UIF)



Editor-In-Chief
Dr. Sanjay Gaikwad

HISTORICITY RESEARCH JOURNAL

ISSN NO:- 2393-8900
Vol- 5| Issue 8 |April -2019

## Contents

# "ओरिसा मंदिर शैलीसंदर्भातील गोविंददासरचित 'शिल्पप्रकाश' मधील गवाक्ष (खिडकी) बांधणी संदर्भातील वास्तुवैज्ञानिक विश्लेषण"

1 Communalism And Partition Of India
**Dr. Amardeep Basappa**

8 "ओरिसा मंदिर शैलीसंदर्भातील गोविंददासरचित 'शिल्पप्रकाश' मधील गवाक्ष (खिडकी) बांधणी संदर्भातील वास्तुवैज्ञानिक विश्लेषण"
प्रा.डॉ.कुलकर्णी (देशमुख) जयश्री रमेश

11 छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे पहिले लोकशाही राज्य
डॉ. लदाफ एस.के.

14 स्वातंत्र्य चळवळीतील सशस्त्र क्रांतीकारकाची माता– मादाम कामा
डॉ. संजय गायकवाड

17 " सोलापूर शहरातील पर्यटनाच्या नव्या वाटा "
डॉ. प्रा. सोपान जावळे

21 कृषीक्षेत्राला शाश्वत सिंचन सोयीची आवश्यकता
प्रा.डॉ. व्हनबिंदगे व्ही.पी.

ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 8 | APRIL - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ''ओरिसा मंदिर शैलीसंदर्भातील गोविंददासरचित 'शिल्पप्रकाश' मधील गवाक्ष (खिडकी) बांधणी संदर्भातील वास्तुवैज्ञानिक विश्लेषण''



प्रा.डॉ.कुलकर्णी (देशमुख) जयश्री रमेश
इतिहास विभागप्रमुख , व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय,
उस्मानाबाद.

**प्रस्तावना :-**

भारतीय वास्तुकला शिल्पकलेला हजारो वर्षांची उत्तुंग अशी परंपरा लाभली आहे. मध्ययुग हे तर भारतीय वास्तु शिल्पकलेचे सुवर्णयुगच म्हणावे लागेल. इस्लामी आक्रमणे व इस्लामच्या सर्वक्षेत्रीय प्रभावाच्या काळातही भारतीय प्रादेशिक कलांनी आपले स्वतंत्र व वैभवसंपन्न अस्तित्व स्वतंत्रपणे सिध्द केलेले दिसते. या सर्व वैविध्यपूर्ण व कौशल्यपूर्ण कलांचे प्रतिबिंब समकालीन साहित्यातही पडलेले दिसते. मध्ययूगीन साहित्य परंपरेतही वैविध्यपूर्ण ग्रंथनिर्मिती होऊन विविध भाषांमधून त्या-त्या प्रदेशांमधील प्रादेशिक कलांविषयी स्वतंत्र व विपूल ग्रंथनिर्मिती झाली. त्यातही वास्तु-शिल्पकला अग्रगण्य होती.

**उद्देश :-**

मध्ययुगीन कालखंडात वैशिष्ट्यपूर्ण व कलात्मक प्रगती झालेल्या वास्तुशिल्प कलेसंदर्भातील विशेषतः मंदिर वास्तु-शिल्प कलेसंदर्भात निवडक ग्रंथ साहित्याचा परामर्श ओरिसा मंदिर शैली संदर्भातील गोविंददास रचित शिल्पप्रकाश ग्रंथाच्या विशेष संदर्भाने घेणे, तसेच 'शिल्पप्रकाश'मधील मंदिर गवाक्ष (खिडकी) संदर्भातील वास्तुवैज्ञानिक विश्लेषणाच्या शास्त्रोक्ततेचा अभ्यास करणे हा या शोधनिबंधामागील उद्देश आहे.

**गृहितके :-**

१) भारतीय वास्तु-शिल्पकलेत ओरिसा मंदिर वास्तुशैलीचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण असे आहे.
२) शिल्पप्रकाश हा गोविंददास रचित ग्रंथ मंदिर वास्तु-शिल्प विषयावर विस्तृत व तपशीलवार माहिती देणारा एकमेवाद्वितीय ग्रंथ आहे.
३) ग्रंथकर्ता हा स्वतः ओरिसा मंदिरशैलीचा तज्ञ व निर्माणकर्ता असावा.
४) ग्रंथकर्त्याच्या ग्रंथलेखनाचा उद्देश या शैलीचा प्रसार व शिक्षण हा असावा व त्याचा परिणाम उत्तर भारतातील इतर प्रदेशातील मंदिर-वास्तु निर्मितीवर नक्कीच झाला असावा.

**विषय मांडणी :-**

मध्ययुगीन ओरिसामध्ये वास्तुशिल्प विषयक अनेक ग्रंथ निर्माण झाले. त्यामध्ये ओडिसी भाषेबरोबरच संस्कृत भाषेतील अनेक ग्रंथांचा समावेश होतो. महापाल भट्टारक लिखित शिल्पप्रकाश, निरंजन महापात्र रचित शिल्पकोश या ओडिसी ग्रंथाप्रमाणेच गोविंददासरचित शिल्पप्रकाश या संस्कृत ग्रंथाचा विशेष उल्लेख यामध्ये करता येतो.

एकुण ६४ कलांपैकी वास्तु-शिल्पकला ही भारतीयांतील सर्वात जुनी व व्यापक कला आहे. त्यातही ओरिसा राज्याला या कलेचा प्राचीन व वैभवसंपन्न वारसा लाभला आहे.[१] शिल्पप्रकाश हा १७ व्या शतकातील मंदिर वास्तुशैली संदर्भातील सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे. त्यामध्ये ओरिसा शैलीची मंदिरे कशी बांधावीत यासंदर्भात सखोल माहिती दिलेली आहे.

'शिल्पप्रकाश' हा गोविंददास यांनी संस्कृत भाषेतून भूर्जपत्रावर लिहिलेला इ.स.१७९३ मधील हस्तलिखित ग्रंथ असून त्याच्या एकूण चार मूळ प्रती उपलब्ध आहेत. विशेष म्हणजे ग्रंथलेखकाने स्वतःची ओळख व लेखनाचा उद्देश ग्रंथातील श्लोक क्र.७९८ ते ८१०

या अंतिम श्लोकांमध्ये स्पष्ट केला आहे.[२] या ग्रंथाच्या मूळ प्रतीवरून त्याचे इंग्रजी भाषांतर इ.स.१९६६ मध्ये पंडित सदाशिव रथ व एलिस बोनर यांनी केले. अलिकडेच डॉ.र.पु.कुलकर्णी यांनी त्याचे मराठीत भाषांतर केले. त्यामुळे शिल्पप्रकाश सर्वांतपर्यंत पोहोचला.

ओरिसा शैलीतील मंदिराचे चार प्रमुख प्रकार आहेत. (१) रेखा, भद्र, खाकरा, गौरीय.[३] या सर्व मंदिर रचनांसंबंधीत कलश, खपूरी, आमला, बेकि, विषम, गंडि, बरंड, उपरजांघ, बांधना, तलजांघ, पाभाग पिष्टं, अधोच्छंद असे शब्द असो वा मंदिर परिसरातील विविध भागांची नावे असोत. या सर्वांचे विश्लेषण या ग्रंथात सविस्तार आहे. वास्तुशैलीतील अशा शब्दांचा अर्थ सांगणारा शिल्परत्नकोश[४] हा संस्कृत ग्रंथही उपलब्ध आहे. या शब्दसंकल्पनांचे व मंदिरघटकांचे विश्लेषण करताना मंदिराच्या गवाक्ष पध्दतीसंबंधी (खिडकी) पहिल्या प्रकाशातील ३६५ ते ३७५ या श्लोकांमध्ये दिलेले आहे. तर श्लोक क्र.८५ मध्ये खिडकी बांधावयाच्या जागेसंबंधी माहिती दिली आहे.

"मध्ये प्रस्थं यथा बाहुवेधे त्रिबाहुसंगमे।
गवाक्षस्नानमेताली शालारन्ध्रः स कथ्यते।।"[५]
(प्रकाश १, श्लोक क्र.८५)

अर्थात रुंदीच्या मध्यभागातील रेघेशी दोन त्रिकोण भिंतीच्या जाडीमध्ये जोडतात. ह्या खिडकीच्या जागा असून त्यांना 'शालारन्ध्र' असे म्हणतात.

गवाक्ष बांधणीच्या पध्दतीची माहिती देताना ग्रंथकार म्हणतो की, मुखशालेच्या दोन्ही बाजूस गवाक्ष बांधताना त्या जागेचे उभे पाच समभाग/विभाग करावेत, तर रुंदीचे आडवे तीन समभाग करावेतृ त्याच्या मध्ये भागात गवाक्ष/खिडकी असावी. खिडकीच्या रचनेबाबतही आकारमान, रचना, नक्षी, उद्देश यावरून अनेक प्रकार सांगितले आहेत. विशेषतः आयताकृती व चौरस आकार प्राधान्याने सांगितलेला आहे. खिडकीच्या खालील थरावर खिडकीच्या रुंदीची तुळई असावी. तीवर वेलबुटटी किंवा पीठप्रकारची नक्षी कोरावी. तिच्या मध्यभागी योग्य असे अलंकरण करावे. या नक्षीयुक्त जागेत चौकोन किंवा आयतात प्राधान्याने विद्यादानाचे दृश्य दाखवितात.[६] या प्रतिकात्मकतेतून तत्कालीन मंदिराचे विद्यादान म्हणजे अध्यापन केंद्र म्हणूनच महत्व ध्यानात घेतलेले दिसते तर श्लोक क्र.३७५ मध्ये याठिकाणी नृपबंध (राजा, राण्या त्यांच्या जीवनातील रोमांचक प्रसंग, युध्द, विजय इ. महत्वपूर्ण घटना) कोरावा असा उल्लेख येतो.

" कारयेन नृपबन्धस्य मण्डले मण्डनावाधि।
श्रृणु तत् स्थानभागेन यथाविधी विधानतः।।"
(प्रकाश १, श्लोक ३७५)

या वरील लक्षणांवरून मंदिरे आणि राजसत्ता यांचा संबंध किंवा राजसत्तेचे प्रभुत्व, महत्व लक्षात येते.

## निष्कर्ष :-

गवाक्ष किंवा खिडकी हे केवळ वातायनाचे साधन नसून ते त्या वास्तूमधील वातावरण, लहरी, भावभक्ती, आरोग्य व मनःस्वाध्य यांच्या स्वस्था-स्वस्थतेचे साधन होय. त्यामुळे दिशा-उपदिशा, वातावरण व हवेची बदलणारी स्थिती, जमिनीपासूनची उंची इ.गोष्टी लक्षात घेतल्या घेऊनच वास्तुच्या गवाक्षाची रचना करणे शास्त्रशुध्द ठरते.

धर्मस्थळ/मंदिर हे तर माणसाच्या श्रध्दा, मनःशांती, विचारिक शुध्दता अशा विविध मनोभावांचे केंद्र असते. त्यामुळे तेथील वातावरण शास्त्रशुध्द वास्तुरचनेच्या सहाय्याने नियंत्रित करण्याचा प्रयत्न त्या-त्या काळातील वास्तुशास्त्रज्ञांनी केला. ओरिसी मंदिर वास्तुशैलीत तर या गोष्टींचा सूक्ष्म विचार केलेला दिसतो.

मध्ययुगीन महाराष्ट्रात हेमाडपंती मंदिर शैलीचे तिच्या भव्यता, अखंडता, वैशिष्ट्यपूर्ण व अलग वास्तुतंत्रामुळे जसे वेगळे स्थान आहे, तसेच ओरिसा मंदिर शैलीचे वास्तुशास्त्रीय दृष्ट्या स्वतंत्र असे स्थान भारतीय वास्तुशैलीमध्ये आहे. या सर्वांचे सगुण-साकार रुप शिल्पप्रकाश या ग्रंथामध्ये पहावयास मिळते. त्याचा सद्यकालीन मंदिर स्थापत्यकारांनी अभ्यास स्वीकार करणे गरजेचे आहे.

## संदर्भ ग्रंथ :-


१) रामचंद्र महापाल कौल भट्टारक - शिल्पप्रकाश - (संपादक-बौमेर, राजेंद्र प्रसाद दास, सदानंद दास)- कलाकोश (कलर मूलशास्त्र शृंखला)- २००५ — प्रस्तावना

२) अनु. र.पु.कुलकर्णी - शिल्पप्रकाश-महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई-२०००-प्रथमावृत्ती-पृष्ठ क्र.१३६ ते ३७

३) कित्ता - पृष्ठ क्र.९

४) निरंजन महापात्र - संपा-बौमेर, राजेंद्र प्रसाद दास- शिल्परत्नकोश-कलाकोश-१९९४
५) रामचंद्र महापाल कौल भट्टारक - शिल्पप्रकाश - (संपादक-बौमेर, राजेंद्र प्रसाद दास, सदानंद दास)- कलाकोश (कलर मूलशास्त्र शृंखला)- २००५ – प्रकाश १ श्लोक क्र.८५
६) अनु. र.पु.कुलकर्णी - शिल्पप्रकाश-महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई-२०००-प्रथमावृत्ती – प्रकाश १, श्लोक क्र.३७४- पृष्ठ क्र.४१